MAHADISCOM

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

वाणिज्य विभाग, प्रकाशगड- ५वा मजला, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व),
मुंबई.४०००५१. फोन: (वै)२६४७४७५३ (का)२६४७४२११; फॅक्स २६४७२३६६

व्र ं . पीआर-जनरल/१०१७० **दिनांक : २७.०४.२००६**

परिपत्रक व्र ं . ३६

विषय: मा.उच्च न्यायालयाच्या अवमानप्र करणातवैयक्तिक उपस्थितीबाबतच्या आदेशांचे पालन करण्याबाबत.

संदर्भ: महाराष्ट्रशासनाचे परिपत्र व्र ं . २११/ई, विधि व न्याय विभाग, दिनांक ३१ मार्च,२००६.

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या परिपत्रकात शासनाने असे नमुद केले आहे कि, मा. उच्च न्यायालयाने एका अवमानयाचिके च्या सुनावणी प्रक्रियेमहाराष्ट्रशासनाच्या अधिकाऱ्यांच्या सुनावणीला अनुपस्थित राहण्याच्या वाढत्या प्रवृत्तीबद्दल नाराजी व्यक्त केली आहे. न्यायालयाने असे नमूद केले की, ज्या व्यक्तींच्या नावे अवमानयाचिके मध्ये उपस्थित राहण्याबद्दल नोटीस निर्गमित केलेली असते त्याप्रकरणी ते अधिकारी वैयक्तिक रित्या उपस्थित रहात नाहीत.

सदर आदेशास अनुलक्षून ज्यांच्या नावे अवमान नोटीस निर्गमित करण्यात आली आहे अशा सर्वांना निर्देश देण्यात येत आहे की, मा. न्यायालयाने कोणत्याही अवमानयाचिके संदर्भात ज्या अधिकाऱ्यांच्या नावे नोटिस निर्गमित केली आहे अशा अधिकाऱ्यांनी नोटीशीमध्ये स्पष्टपणे नमूद केले असल्यास ,निर्देशित केलेल्या दिवशी वैयक्तिक रित्या उपस्थित रहावे.

तरी या परिपत्रकान्वये सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना कळविण्यात येते कि, सदर आदेशाचे काटेकोर पालन करण्यात यावे.

सहपत्र: वरीलप्रमाणे.

मुख्य अभियंता (वाणिज्य)

प्रति,
मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं .मर्यादित सर्व परिमंडळे
अधिक्षक अभियंता, म.रा.वि.वि.कं .मर्यादित सर्व मंडळे
कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं .मर्यादित सर्व विभागीय कार्यालये
उपकार्यकारी अभियंता/सहायक अभियंता, म.रा.वि.वि.कं .मर्यादित सर्व उपविभागीय कार्यालये

Created by Neevia Personal Converter trial version http://www.neevia.com